संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# नरेंद्र मोदी तसे नशीबवान खरे पण...

केंद्रातल्या सत्तापरिवर्तनाला सहा महिने पूर्ण होत आहेत. अच्छे दिनाचे स्वप्न दाखवून मोदी सत्तेवर आले. आता हे अच्छे दिन नेमके कोणकोणत्या स्वरुपामध्ये असतील हे स्पष्ट व्हायला आणखी सहा महिने जातील असे वाटते. परंतु एक गोष्ट मात्र खरी की, नरेंद्र मोदी हा माणूस नशीबवान म्हटला पाहिजे. ते सत्तेवर आले आणि पुढच्या महिन्याभरामध्ये आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये कच्च्या तेलाच्या किमती धडाधड उतरायला लागल्या आणि भारतातला महागाई निर्देशांकही घसरायला लागला. मोदींनी काही योजना मनात आणाव्यात आणि त्याला सगळीकडून भरभरून प्रतिसाद मिळावा, हादेखील नशिबाचाच भाग म्हणावा लागेल. मग ते स्वच्छता अभियान असो किंवा दिवाळीचे निमित्त साधून त्यांनी पूरग्रस्त काश्मिरी जनतेबरोबर आणि सीमेवरच्या जवानांबरोबर घेतलेले भोजन असो. एवढेच नव्हे तर गेल्या सहा महिन्यांत त्यांनी किमान सहा देशांना भेटी दिल्या आणि त्यांचे हे सगळे दौरे नुसते हीटच नव्हे तर सुपरहिट ठरले. अमेरिकेमध्ये इतके प्रचंड मोठे स्वागत झालेले भारताचे हे पहिलेच पंतप्रधान असावेत. त्यापाठोपाठ ऑस्ट्रेलियातही त्यांचे जंगी स्वागत झाले. नेपाळचा पहिला दौरा यशस्वी ठरल्यानंतर आता सार्क देशांच्या परिषदेच्या निमित्ताने ते पुन्हा नेपाळला गेले आहेत आणि आता तर तिथल्या जनतेनेच त्यांची जाहीर सभा ऐकण्यासाठी आग्रह धरला होता. याच सार्क परिषदेचे औचित्य साधून दिल्ली काठमांडू अशी थेट बससेवा सुरू केल्याने नेपाळी जनता मोदींवर आणखीनच खूश झाली आहे. या त्यांच्या सगळ्या मोहिमा यशस्वी होत असताना त्यांनी एक जबरदस्त सिक्सर मारला आणि २०१५च्या प्रजासत्ताक दिनासाठी अमेरिकेचे अध्यक्ष बराक ओबामांना आमंत्रित करून परराष्ट्रीय मुत्सद्दीपणाही दाखवून दिला. एकीकडे त्यांच्या या कामाचा धडाका सुरू असताना दुसरीकडे मात्र देशाच्या सामान्य माणसाच्या अपेक्षांकडे दुर्लक्ष होईल की काय अशीही शक्यता वाटू लागली आहे. कारण महागाई जरी कमी होत असली तरी आज संपूर्ण देशाला भेडसावणारे सर्वात मोठे प्रश्न म्हणजे गरिबी, बेरोजगारी आणि भ्रष्टाचार हे होय. मोदी नशीबवान आहेत असे म्हणत असतानाच देशाच्या सामान्य माणसाच्या नशिबात मात्र अजून पाहिजे तसा बदल दिसू लागलेला नाही.

### लोकांच्या अजूनही अपेक्षा

लोकांनी निश्चितपणे काही अपेक्षा ठेवून यावेळेला मोदींना मतदान केले. भाजपापेक्षाही मोदी हेच या सगळ्या यशाचे सूत्रधार ठरले. लोकांना एकूणच स्वत:च्या दैनंदिन जीवनामध्ये बदल हवा होता. देशाचा राज्यकारभार या एका ठरावीक चौकटीमध्ये आणि ठरावीक व्यक्तींच्या हातामध्ये केंद्रित झाला होता. तो मुक्त करायचा होता. मोदींनी काँग्रेसमुक्त भारत अशी जी घोषणा केली तीदेखील लोकांच्या मनाला भावली होती. निदान लोकसभा निवडणुकीत तरी केंद्र सरकार काँग्रेसच्या तावडीतून मुक्त झाले. अर्थात पुन्हा नशिबाचाच भाग म्हटले तर त्यानंतर झालेल्या राजस्थान, महाराष्ट्र, हरियाणा या राज्यांमध्ये काँग्रेसचा दणदणीत पराभव झाला. पुन्हा एकदा मोदींना नशिबाने साथ दिली आणि त्यांच्या काँग्रेसमुक्त भारत या घोषणेचा पुढचा अध्याय सुरू झाला आता काश्मीर आणि झारखंडमध्ये पहिल्या टप्प्याचे मतदान संपले आहे. परंतु महत्त्वाचा भाग असा की, या दोन्ही ठिकाणी अनपेक्षित असे मतदान झाले. काश्मीरमध्ये तर दहशतवाद्यांनी जागोजागी फलक लावून धमक्या दिल्या होत्या आणि लोकांनी मतदारांवर बहिष्कार घालावा असे आवाहन केले होते. परंतु काश्मिरी जनतेने दहशतवादाला झुगारले. आणि मतदानाला स्वीकारले असेही चित्र पहायला मिळाले आहे. पहिल्या टप्प्यामध्ये तब्बल सत्तर टक्के मतदान होण्याचा विक्रम काश्मीरमध्ये नोंदला गेला आहे. आता या सर्वाधिक मतदानाचे परिणाम काय असतील हे निकालाच्यादिवशी समजेल. परंतु तिथे असणाऱ्या सरकारांच्या बाजूने जनतेचा पूर्वीसारखा कौल नसेल हे स्पष्ट होते. बदलाचे वारे अजूनही सुरू आहेत. ठिकठिकाणी असलेली राज्य सरकारे त्याच त्या पध्दतीने कामे करतात आणि पुन्हा पुन्हा निवडून येतात. भ्रष्टाचार करूनही झारखंडमध्ये शिबू सोरेन सत्तेमध्ये येऊ शकतात. किंवा फारुख अब्दुल्लांचे घराणे सातत्याने सत्ता ताब्यात ठेवू शकते. या प्रकारांनादेखील जनता कंटाळलेली आहे. मतदानाची टक्केवारी पाहिल्यानंतर वाटते की, त्या ठिकाणी परिवर्तनाचे लक्षण सांगणारी ठरते.

### भ्रष्टाचार थांबलेला नाही

राजकारणामध्ये प्रामाणिकपणे काम करण्याची आणि जनतेसाठी राजकारण करण्याची इच्छा असेल तर काय घडू शकते याचे उदाहरण म्हणून गेल्या सहा महिन्यातल्या या घटनांकडे पहावे लागेल, पुढच्या अनेक बदलांची कदाचित सुरुवात असू शकेल. परंतु मोदी सरकारने हुरळून जाता कामा नये. किंवा प्रजासत्ताक दिनाचे निमंत्रण बराक ओबामांनी स्वीकारले याचा अर्थ आपण फार मोठे कर्तृत्व सिध्द केले, असे समजण्याचे कारण नाही. ही गोष्ट खरी की ओबामांना बोलवण्याची कल्पना सूचणे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे ओबामांनी ती कोणतीही खळखळ न करता स्वीकारणे हे निश्चितच कौतुकास्पद ठरते. आतापर्यंत काँग्रेसच्या नेत्याने नरेंद्र मोदी हे उत्कृष्ट सेल्समन आहेत अशा प्रकारची टीका केली. महाराष्ट्रात शरद पवारांनी तर मोदींच्या मार्केटिंगला सलाम केला आहे आणि आपण त्यांच्यासारखे मार्केटिंग कधीच करणार नाही. अशी कबुलीही त्यांनी दिली आहे. अर्थात ओबामांनी निमंत्रण स्वीकारणे किंवा काठमांडूमध्ये मोदींच्या जाहीरसभांचा आग्रह धरला जाणे, हा मार्केटिंगचा प्रकार नसून भारताविषयी सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्याचा भाग आहे. या सगळ्या गोष्टी करत असतानाच मोदी यांनी जर काळा पैसा भारतात आणण्याचा करिष्मा करून दाखवला तर लोक त्यांचे आणखीनच कौतुक करतील. गेल्या सहा महिन्यांत हा काळा पैसा शोधण्यासंदर्भात किंवा तो भारतात आणण्याबाबत फारशी प्रगती झालेली नाही. याचा दुसरा अर्थ असा होतो की, सत्ता परिवर्तन होऊनही भ्रष्टाचार थांबलेला नाही. नव्या सरकारचा प्रभाव पैसे खाणाऱ्यांवर अजून पडलेला नाही म्हणूनच मोदी नशीबवान आहेत, हे जरी खरे असले तरी अजून त्यांना बरेच नशीब आजमावायचे आहे, असे म्हणावे लागते.